नारळ विकास मंडळ, कोची पुरस्कृत नारळाच्या उत्पादकतेत एकात्मिक शेती अंतर्गत वाढ घडवून आणणे हा कार्यक्रम सन २०१५-१६ मध्ये राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-नावियो-०६१५/प्र.क्र.११२/१३ अे**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०७/०९/२०१५

<u>वाचा</u> :- १) नारळ विकास मंडळ, केंद्र शासन, कृषि मंत्रालय, कोची यांचे पत्र क्र.सं एफ़ F.No:२२३/२०१५- Dev विकास,दिनांक २६ मे,२०१५

<u>प्रस्तावना</u> :-

नारळ विकास मंडळ, कृषि मंत्रालय, कोची यांनी त्यांचे संदर्भाधीन दिनांक २६ मे,२०१५ च्या पत्रासोबतच्या परिशिष्ट-१ मधील नारळ विकास मंडळ, कोची पुरस्कृत नारळाच्या उत्पादकतेत एकात्मिक शेती अंतर्गत वाढ घडवून आणणे हा कार्यक्रम सन २०१५-१६ या वर्षी राबविण्यास रु.६९.९८१ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिली असून राज्य शासनास वरीलप्रमाणे मान्यता देण्याची विनंती करण्यात आली आहे.

२. नारळ विकास मंडळ, कोची यांच्या उपरोक्त पत्रातील योजनेची एकुण माहीती व सदर योजनेमुळे राज्यातील शेतक-यांना होणारा लाभ तसेच सदर योजनेस केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाने दिलेली मान्यता या बाबी विचारात घेऊन नारळ विकास मंडळ, कोची पुरस्कृत नारळाच्या उत्पादकतेमध्ये एकात्मिक शेती अंतर्गत वाढ घडवून आणणे हा कार्यक्रम सन २०१५-१६ मध्ये राबविण्याच्या रु.६९.९८१ लक्ष इतक्या रकमेच्या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

सन २०१५-१६ मध्ये नारळ विकास मंडळ, कोची पुरस्कृत नारळाच्या उत्पादकतेमध्ये एकात्मिक शेती अंतर्गत वाढ घडवून आणण्यासाठी रु.६९.९८१ लक्ष इतक्या रकमेच्या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त योजनेतील राज्य शासनातर्फे राबवावयाच्या कार्यक्रमासाठी लागणारा निधी नारळ विकास मंडळ, कोची यांनी लेखाधिकारी विभागीय कृषि सहसंचालक यांचे कार्यालय, कोकण विभाग, ठाणे यांच्या नावे डिमांड ड्राफ्टने उपलब्ध करुन द्यावा.

३. या कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेली आर्थिक व भौतिक उद्दिष्टे, अनुदानाचा दर यांची सविस्तर माहिती संदर्भाधीन पत्रासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आलेली आहे. निधी मान्यतेच्या अटी परिशिष्ट-२ मध्ये मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

४. प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता उद्दिष्ट निहाय मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याकरीता तसेच राज्य शासनाने राबवावयाच्या उद्दीष्टासाठी लागणारा निधी नारळ विकास मंडळ, कोची यांचेकडून उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही करण्याकरिता संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. मार्गदर्शक सूचना निर्गमित करतेवेळी पुढील बाबी अंतर्भूत करण्याची दक्षता घेण्यात यावी.

५. प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी करताना महिलांसाठी ३०%, अनुसूचित जातीकरीता १६.२% व अनुसूचित जमातीकरीता ८% व अपंग व्यक्तींसाठी ३ % अशी विशेष तरतूद करण्यात यावी.

६. गत दोन वर्षात वैयक्तीक लाभ दिलेल्या लाभधारकांची यादी तालुका कार्यालये /पंचायत समिती /जिल्हाधिकारी कार्यालयात लावण्यात यावी. तसेच ती यादी इंटरनेटवर देखील देण्यात यावी.

७. योजनेच्या अंमलबजावणीचा मासिक व तिमाही प्रगती अहवाल नारळ विकास मंडळास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी सादर करण्यात यावा.

८. प्रस्तुत योजनेच्या यशस्वी व कालबध्द अंमलबजावणीकरीता खालीलप्रमाणे राज्यस्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| १) अपर मुख्य सचिव (कृषि व फलोत्पादन) | -- | अध्यक्ष |
| २) संचालक,फलोत्पादन,महाराष्ट्र राज्य ,पुणे | -- | सदस्य |
| ३) भारतीय कृषि संशोधन परिषदेचा प्रतिनिधी | -- | सदस्य |
| ४) कृषि विद्यापिठाचा प्रतिनिधी | -- | सदस्य |
| ५) नारळ विकास मंडळाचा राज्यातील प्रतिनिधी | -- | सदस्य |
| ६) उप संचालक,नारळ विकास मंडळ,विभागीय शाखा,ठाणे | -- | संघटक |

९. संचालक(फलोत्पादन),महाराष्ट्र राज्य,पुणे यांना सदर योजनेच्या अंमलबजावणीकरीता संपर्क अधिकारी म्हणून नामनिर्देशित करण्यात येत आहे. संचालक (फलोत्पादन) यांचा संपर्कासाठी तपशिल खालीलप्रमाणे आहे.

संचालक (फलोत्पादन)
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
के.बी.जोशी मार्ग,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५.
दुरध्वनी क्रमांक - ०२०- २५५३८०९५/२५५३७५६५
फॅक्स क्रमांक -०२० -२५५३७५६५

१०. प्रस्तुतचे आदेश वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ मधील भाग- पहीला , उपविभाग-तीन मधील अनु.क्र.४ येथील नियम २७(२) मध्ये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारामध्ये निर्गमित करण्यात येत आहेत.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१५०९०७१६५८३८८१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SAKHARKAR AMOL NILKANTH

Digitally signed by SAKHARKAR AMOL NILKANTH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AAHDDF,CID - 920025, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SAKHARKAR AMOL NILKANTH
Date: 2015.09.09 14:50:28 +05'30'

**(अ.नि.साखरकर)**
**कार्यासन अधिकारी,**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.**

**प्रति,**

संचालक (फलोत्पादन),कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,के.बी.जोशी मार्ग,पुणे.

**प्रत,**

१) मा. मंत्री (कृषि)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
२) मा.अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
३) अध्यक्ष, नारळ विकास बोर्ड (कृषि मंत्रालय, भारत सरकार) केरा भवन, एसआरव्हीएचएस रोड,कोची ६८२०११.
४) मा.आयुक्त, (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१७
५) उपसचिव (फलोत्पादन),महाराष्ट्र राज्य,पुणे.
६) विभागीय कृषि सहसंचालक, कोंकण विभाग, ठाणे-४
७) उपसंचालक,नारळ विकास बोर्ड,रोड क्र.१६,झेड लेन,वागळे इस्टेट,ठाणे (पश्चिम),जि.ठाणे.
८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी द्वारा विभागीय कृषि सह संचालक ,कोकण विभाग, ठाणे,
९) निवडनस्ती १३-अे कार्यासन.

**अति तात्काळ**

जा.क्र.कृषिआ/फलो-२/ना.वि.यो.मा.सु/१४-१५/ २५८३/१४
कृषि आयुक्तालय (फलोत्पादन) महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११ ००५ दिनांक- २० आक्टोंबर,२०१४

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक**
**ठाणे / कोल्हापूर / पुणे विभाग.**

**विषय :-** नारळ विकास मंडळ पुरस्कृत अल्प प्रक्षेत्रातील नारळाच्या उत्पादकतेत एकात्मिक शेतीअंतर्गत वाढ घडवून आणण्याची योजना सन २०१४-१५ मध्ये राज्यात राबविणेबाबत ....

**संदर्भ :-** १) चीफ कोकोनट डेव्हलपमेंट ऑफीसर, नारळ विकास मंडळ, कोची (केरळ) यांचे पत्र क्र. २२३/२०१३/डीईव्ही (विकास), दिनांक :- १९/५/२०१४
२) शासन निर्णय क्र नाविमा-२०१४/प्र.क्र.१४०/१३अे/मंत्रालय,मुंबई-३२ दि.९/७/२०१४

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ नुसार नारळ विकास मंडळ कोची पुरस्कृत नारळ विकास योजना २०१४-१५ मध्ये राज्यात राबविण्यासाठी रु. १५५.०९८ लाखाच्या कार्यक्रमास मान्यता दिलेली आहे. संदर्भिय शासन निर्णय क्र. २ नुसार राज्य शासनाकडून सदरच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. विभागीय नारळ रोपवाटिकांची स्थापना करणे (५०:५० तत्वावर)अंतर्गत नारळ रोपे उत्पादन कार्यक्रम हा कृषि विभागामार्फत राबविण्यात येत आहे. एकात्मिक शेतीव्दारे नारळबागांच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणण्याच्या कार्यक्रमांतर्गत प्रात्यक्षिक क्षेत्राच्या स्थापना करणे व क्षेत्रविस्तार या बाबींअंतर्गत प्रथम वर्ष लागवड व द्वितीय वर्ष देखभालीसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सदरचा कार्यक्रम नारळ विकास मंडळामार्फत राबविण्यात येणार आहे. नारळ विकास योजना कोंकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये राबविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना सोबत सहपत्रित करण्यात येत आहेत. नारळ विकास मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार कार्यक्रम राबविण्यात यावा व या योजनेचा विहीत नमुन्यातील मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**सोबत- वरील प्रमाणे**
मार्गदर्शक सुचना

**स्वाक्षरीत**
**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे- ४११००५

**प्रत :**

१) **मा.अप्पर मुख्य सचिव,** (कृषि व फलोत्पादन) कृषि व पदुम विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर .
२) **उपसंचालक,** नारळ विकास बोर्ड, स्टेट सेंटर, रोड नं.१६, झेड लेन, वागळे इस्टेट, ठाणे -४०० ६०४ यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.
३) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे व कोल्हापूर यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
४) **कृषि उपसंचालक,** (नियोजन) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव.



--

**नारळ विकास मंडळ पुरस्कृत अल्प प्रक्षेत्रातील नारळाच्या उत्पादकतेत एकात्मिक शेतीअंतर्गत वाढ घडवून आणणे हा कार्यक्रम सन २०१४-१५ मध्ये राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

---

**१. नारळ रोपवाटिका स्थापना करणे (५०% नारळ विकास मंडळ व ५०% राज्य पुरस्कृत)**

**अ) विभागीय नारळ रोपवाटिकेची स्थापना करणेअंतर्गत नारळ रोपे उत्पादन कार्यक्रम.**

सन २०१३-१४ मध्ये राज्यात रायगड जिल्हयांतील किल्ला, कोल्हापूर जिल्हयांतील आजरा व पुणे जिल्हयांतील च-होली येथे नारळ रोपवाटिकेची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर रोपवाटिकांमधील रोपांचे उत्पादनासाठी येणारा ५० % आवर्ती खर्च भागविण्यासाठी रु.१६/- प्रति रोप अनुदान नारळ विकास मंडळामार्फत देण्यात यावे. तसेच उर्वरित ५०% अनुदान रु.१६/- प्रति रोप याप्रमाणे राज्य शासनामार्फत देण्यात यावे. सदरची बाब ही कृषि विभागामार्फत राबविण्यात यावी. रोपवाटिकेवरील कर्मचारी व पायाभूत सुविधांसाठी आवश्यक निधी शासकीय रोपवाटिकेचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत प्राप्त राज्यस्तरीय व जिल्हा नियोजन विकास मंडळामार्फत दिल्या जाणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

सन २०१४-१५ मध्ये रायगड जिल्हयांतील किल्ला रोपवाटिका व कोल्हापूर जिल्हयांतील आजरा रोपवाटिकेवर प्रत्येकी ५०,००० नारळ रोपे व पुणे जिल्हयांतील च-होली येथे २५,००० नारळ रोपांचे असे एकूण १,२५००० नारळ रोपे उत्पादनाचे लक्षांक देण्यात येत आहे. रोपवाटिकांवरील नारळ रोपांचे उत्पादनासाठी दर्जेदार नारळांची निवड करण्यात यावी व उत्पादनासाठी सदर रोपवाटिकावर उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा वापर करण्यात यावा.

**ब) लहान रोपवाटिकांची स्थापना** :- खाजगी क्षेत्रातील तसेच इतर यंत्रणामार्फत नारळ रोपे उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी नारळाचे लहान रोपवाटिकांच्या स्थापनेसाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. सदर अर्थसहाय्य ०.४० हेक्टर क्षेत्रासाठी जास्तीत जास्त रु.२.०० लाख मर्यादेपर्यंत देण्यात यावे. यामध्ये १०० % बियाण्याची किंमत, वाहतूक, रोपवाटिकांची देखभाल व इतर पायाभूत सुविधा इत्यादी साठी येणा-या खर्चाचा समावेश करण्यात आलेला आहे.

**२. नारळ क्षेत्र विस्तार कार्यक्रम (नारळ विकास मंडळामार्फत) :-**

अ) नारळ क्षेत्रविस्तार कार्यक्रमांतर्गत एका लाभार्थ्यास प्रथम वर्षातील लागवडीसाठी विहित मापदंडाच्या २५% जास्तीत जास्त रु.७५००/- प्रति हेक्टर व ४ हेक्टर मर्यादेपर्यंत क्षेत्रासाठी दोन समान हप्त्यामध्ये अनुदान देण्यात यावे. नारळ क्षेत्र विस्तार कार्यक्रमातंर्गत वापरले जाणारे नारळ बियाणे शासकीय / नारळ विकास मंडळ /CPCRI / नारळ विकास मंडळ अर्थसहायित खाजगी रोपवाटिका खाजगी रोपवाटिका, कृषि विद्यापीठातील रोपवाटिकांमधून घेण्यात यावे.

ब) नारळ क्षेत्र विस्तार कार्यक्रमाअंतर्गत दुस-या हप्त्यासाठी रु.४०००/- प्रति हेक्टर याप्रमाणे अनुदान नारळ विकास मंडळामार्फत देण्यात यावे.

**३. एकात्मिक शेतीद्वारे नारळाच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणण्याचा कार्यक्रम (नारळ विकास मंडळामार्फत)**

**अ) <u>प्रात्यक्षिक क्षेत्राची स्थापना</u>** –

राज्यात जुन्या नारळ बागांचे क्षेत्र ८३०० हेक्टर पेक्षा जास्त आहे. या बागांची उत्पादकता कमी आहे. या नारळ बागांची उत्पादकता कमी असण्याच्या मुख्य कारणांमध्ये रोगग्रस्त झाडे, कमी उत्पादन देणारी झाडे, शास्त्रोक्त पध्दतीने लागवड न करणे, सुधारित व्यवस्थापन पध्दतीचा अभाव वगैरे कारणांचा समावेश आहे.

या कमी उत्पादन असणा-या बागांची उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून ही योजना राबविणेत येत आहे. यामध्ये नारळ बागेतील रोगग्रस्त, उत्पादन न देणारी झाडे काढून टाकणे, जुन्या झाडांच्या ठिकाणी नविन झाडांची लागवड करणे, रासायनिक खते, पीक संरक्षण, पाणी व्यवस्थापन इत्यादी बाबीचा अवलंब करणे व नारळ बागांमध्ये आंतरपीक घेणे वगैरे बाबींचा अवलंब करण्यात येतो.

**३.१. <u>नारळ बागेतील रोगग्रस्त व उत्पादन न देणारी नारळाची झाडे काढून टाकणें</u> -**

नारळ बागेतील जास्त वयाची उत्पादन न देणारी व रोगग्रस्त झाडे काढून टाकणे या घटकांतर्गत १५ झाडे काढून टाकावी लागतील असे अपेक्षित आहे. या काढावयाच्या झाडापासून थोडेफार उत्पन्न मिळत असल्याने ही झाडे काढल्यामुळे शेतक-यांचे नुकसान होणार आहे तेव्हा एक झाड काढणेसाठी शेतक-यास रु.२५०/- या प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येईल.

या घटकाचा लाभ देण्यासाठी क्षेत्रीय कर्मचायामार्फत नारळ बागेची प्रत्यक्ष पहाणी करण्यांत यावी. ज्या ठिकाणची झाडे काढण्यात येणार आहेत, त्या ठिकाणी सुधारित वाणांच्या रोपांची लागवड करण्यात येईल अशी हमी संबंधित लाभार्थीकडून घेण्यात यावी. निवडलेल्या क्षेत्रामधील विहीत मर्यादेत झाडे काढून टाकल्यानंतर व त्याठिकाणी नवीन रोपांची लागवड केल्यानंतर संबंधित कृषि आधिका-यामार्फत पहाणी / तपासणी करण्यात येईल व त्यानुसार संबंधित लाभार्थींच्या बँक खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम जमा करणेत यावी. सदरची रक्कम प्रति हेक्टरी जास्तीत जास्त रुपये ३७५०/- इतकी राहील.

**३.२. काढलेल्या <u>झाडांच्या ठिकाणी सुधारित वाणांची रोपे लागवड करणेसाठी अर्थसहाय्य -</u>**

रोगग्रस्त / कमी उत्पादन देणारी झाडे काढून टाकल्यानंतर त्याठिकाणी नवीन सुधारित वाणांच्या रोपांची लागवड करणेसाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. यासाठी हेक्टरी जास्तीतजास्त १५ रोपांना अर्थसहाय्य देण्यात यावे. या घटकांतर्गत सुधारित वाणांपैकी **बाणावली या वाणाच्या रोपास रु.२३/- आणि टी x डी या वाणाच्या रोपास रु.२५/-** प्रमाणे अर्थसहाय्य देण्यात यावे.



--

बाणावली बाणाच्या रोपाद्वारे पुर्नलागवड केल्यास हेक्टरी जास्तीत जास्त रु.३४५/- व टी x डी वाणाच्या रोपाद्वारे पुर्नलागवड केल्यास हेक्टरी जास्तीतजास्त रु.३७५/- इतके अर्थसहाय्य देण्यात यावे. सदरची नारळ रोपे शासकीय रोपवाटिका/ कृषि विद्यापीठ / नारळ विकास मंडळाचे फार्म अथवा नारळ विकास मंडळाने प्राधिकृत केलेल्या खाजगी रोपवाटिकेवरुनच घ्यावीत.

**३.३. <u>रासायनिक खते व पीक संरक्षण -</u>**

नारळाच्या पूर्ण वाढ झालेल्या झाडास १ किलो नत्र + ५०० ग्रॅम स्फुरद + १ किलो पालाश व ५० किलो शेणखत देणे आवश्यक आहे. त्यानुसार हेक्टरी नत्र १५० किलो + स्फुरद ७५ किलो + पालाश १५० किलो व शेणखत ७.५ मे.टन / निम केक ५ किलो प्रति झाड देणे आवश्यक आहे. तेव्हा या घटकांतर्गत रासायनिक व शेणखतासाठी हेक्टरी अनुक्रमे रक्कम रुपये २८५०/- व ७५००/- च्या मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात यावे.

नारळाच्या झाडावर विविध किड व रोगांचा प्रादुर्भाव होवून त्याचा उत्पादकतेवर विपरीत परिणाम होतो. या किड व रोगापासून नारळाचे संरक्षण करण्यासाठी पिक संरक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा. यासाठी कृषि विद्यापिठ / कृषि विभागाच्या पीक संरक्षण पुस्तिकेतील शिफारसीनुसार पीक संरक्षण औषधे वापरण्यात यावीत. इरियोफाईड माईटसच्या नियंत्रणासाठी नॅशनल स्टिअरिंग कमिटी ऑन कोकोनटच्या शिफारशी अंमलात आणाव्यात. यासाठी कमाल रुपये ६६१५/- प्रति हेक्टर इतके अर्थसहाय्य देण्यात यावे. यामध्ये इरियोफाईड माईटस् ग्रस्त नारळ बागांच्या प्रक्षेत्रात प्राधान्याने प्रात्यक्षिके आयोजित करण्यात यावीत. या घटकाचा लाभ लाभार्थीस दोन वर्षासाठी दयावा.

रासायनिक खते व पीक संरक्षण औषधे प्राथम्याने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मार्केटिंग फेडरेशन यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात यावीत. यासाठी विहीत कार्यप्रणालीचा अवलंब करणेत यावा. रासायनिक खतासाठी कृषि विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे खर्च करणेत यावा व निमपेंड / सेंद्रीय खत स्थानिकरित्या खरेदी करावे अथवा संबंधित लाभार्थीकडून पावती घेण्यात यावी.

**३.४ <u>आंतरपिक</u>**

नारळ बागांची उत्पादकता वाढविणेच्या अनुषंगाने नारळ बागेत आंतरपिक म्हणून भाजीपाला लागवड केल्यास त्याचा शेतक-यांना निश्चितच फायदा होईल. या घटकांतर्गत भाजीपाला बियाणे / रोपे, खते, पीक संरक्षण औषधे इत्यादी बाबीसाठी हेक्टरी रुपये २७०/- च्या मर्यादेत अर्थसहाय्य दयावे, या घटकाचा लाभ लाभार्थीस दोन वर्षासाठी दयावा.

**<u>लाभार्थी निवड -</u>**

१) या घटकासाठी लाभार्थीची निवड ' **निवड समिती** ' मार्फत करणेत येईल.

२) ज्या शेतक-याकडील नारळाच्या जुन्या बागेमध्ये (किमान ७ वर्ष वयाची बाग) रोगग्रस्त / अनुत्पादक झाडे असतील अशा शेतक-यांची निवड करावी. अशा बागा सलग क्षेत्रातील असाव्यात.

३) महिला ३० टक्के, अनु.जाती १६.०२ टक्के, अनु.जमाती ८ टक्के असा लाभ देण्यात यावा.



--

४) मागील दोन वर्षात लाभ मिळालेल्या लाभार्थीची यादी तालुका कार्यालये/पंचायत समिती/जिल्हाधिकारी कार्यालयात लावण्यात यावी. तसेच ती यादी इंटरनेटवर देखील देण्यात यावी.

५) या घटकाचा लाभ कमीत कमी ०.१० हेक्टर व जास्तीत जास्त १.० हेक्टर साठी दयावा. मात्र लाभ देताना सलग क्षेत्रातील समुहाकरिता लाभ दयावा. जेणेकरुन एकत्रित परिणाम साधणे शक्य होईल. तसेच कीड / रोगाचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या क्षेत्रात प्राधान्याने प्रात्यक्षिके आयोजित करावीत.

६) या घटकासाठी निवडलेले क्षेत्र शक्यतो रस्त्याच्या जवळ असावे. प्रात्यक्षिकासाठी निवड करण्यात आलेल्या प्लॉटमधून प्रात्यक्षिक आयोजित करण्यापुर्वी मिळणाया वार्षिक उत्पादनाची नोंद घ्यावी

७) निवडलेल्या क्षेत्रास 'नारळ विकास मंडळाच्या अर्थसहाय्याने' असा फलक लावण्यात यावा. यासाठी २४x३६ इंच आकाराचा फलक लावावा व त्यासाठी रु.१०००/-मर्यादेपर्यंत खर्च करण्यात यावा.

८) निवड केलेल्या प्रात्यक्षिक क्षेत्रास दोन वर्ष लाभ दयावा.

**प्रात्यक्षिक क्षेत्रासाठी खर्च प्रमाणके**

| अ. क्र | बाब | परिमाण | प्रथम वर्ष मापदंड रुपये | द्वितीय वर्ष मापदंड रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | नारळ बागेतील रोगग्रस्त/अनुत्पादक झाडे काढून टाकणे | प्रति हेक्टर | ३७५०.०० | |
| २ | काढलेल्या झाडाच्या ठिकाणी सुधारित वाणांच्या रोपांची लागवड | प्रति हेक्टर | ३४५.०० | |
| ३ | सेंद्रीय खते<br>शेणखत ७.५ मे.टन / निम केक ५ किलो/माड | प्रति हेक्टर | ७५००.०० | ७५००.०० |
| ४ | रासायनिक खते<br>(हेक्टरी नत्र १५० किलो+ स्फुरद ७५ किलो +पालाश १५० किलो) | प्रति हेक्टर | २८५०.०० | २८५०.०० |
| ५ | पीक संरक्षण<br>(५ टक्के अझॅडिरेक्टीन ७.५ मि.ली. अधिक ७.५ मि. ली. पाणी मिश्रण ३ वेळा मुळाद्वारे देणे) | प्रति हेक्टर | ६६१५.०० | ६६१५.०० |
| ६ | आंतरपीक / हिरवळीची खते | प्रति हेक्टर | २७०.०० | २७०.०० |
| ७ | आंतरमशागत | प्रति हेक्टर | १०००.०० | १०००.०० |
| ८ | प्रात्यक्षिकाचा फलक | प्रति प्रात्यक्षिक | १०००.०० | |
| | | **एकूण** | **२३३३०.००** | **१८२३५.००** |

**टीप : वरील खर्च प्रमाणकानुसार आणि नारळ विकास मंडळाकडून मिळणा-या कमाल अर्थसहाय्याच्या रु. १७५००/- प्रति हेक्टर प्रति वर्षीच्या अधीन राहून प्रथम व द्वित्तीय वर्षासाठी अर्थसहाय्य देण्यात येत आहे.**

राज्य पुरस्कृत पिक संरक्षण योजनेंतर्गत नारळ पिक संरक्षण योजनेच्या लाभ दिलेल्या क्षेत्रास सदर योजनेतून लाभ देण्यात येऊ नये. ही प्रात्यक्षिके सलग क्षेत्रातील बागांमध्ये राबवावयाची आहेत.मात्र अशा क्षेत्रात राज्य पुरस्कृत पिक संरक्षण योजनेतून लाभ दिलेला असल्यास पिक संरक्षण घटक वगळता इतर बाबींचा लाभ नारळ विकास मंडळाच्या योजनेतून देय राहील.

१. **सेंद्रिय खतांचे युनिटस् स्थापन करणे-**

नारळाच्या झाडास **'कल्पवृक्ष'** म्हटलेले आहे. नारळाच्या झाडाचे सर्व भाग उपयुक्त आहेत. तरीही नारळाची पाने, पानाचे देठ, शेंडी, नारळाची पोय, मुळे वगैरे भागांचा उपयोग योग्य प्रकारे केला जात नाही. या सर्व भागांपासून चांगल्या प्रतीचे सेंद्रीय खत निर्माण होवू शकते व त्याचा वापर नारळ बागेमध्ये करणे शक्य आहे. सेंद्रीय खताचा वापर नारळ बागेमध्ये केल्यास जमिनीची सुपिकता टिकविण्यास व नारळ बागांची उत्पादकता वाढविण्यांस निश्‍चितच मदत होणार आहे. या दृष्टीने हा घटक राबविण्यात येणार आहे.

या घटकांतर्गत सेंद्रीय खत निर्मिती युनिट स्थापन करण्यासाठी १०० % अर्थसहाय्य जास्तीत जास्त रु.६०,००० प्रति युनिट याप्रमाणे देण्यात येईल.

सेंद्रिय खत निर्मिती युनिटचे आकारमान २४०० घनफुट (६० फुट X ८ फुट X २.५ फुट किंवा ३० फुट x ८ फुट x २.५ फुट आकाराची दोन युनिटस) असणे आवश्यक आहे. सदर युनिट कायम स्वरुपाचे असावे.लहान आकाराच्या खत निर्मिती युनिटला देखील प्रोत्साहन देण्यात यावे, त्याचे किमान आकारमान १५० घनफुट (१५ फुट X ५ फुट X २ फुट) राहील व आर्थिक सहाय्य त्याप्रमाणात देण्यात यावे.

**सेंद्रीय खत निर्मिती या घटकासाठी लाभार्थी निवड -**

१) या घटकासाठी लाभार्थीची निवड ही 'निवड समिती' मार्फत करण्यात येईल.

२) लाभार्थीकडे किमान दोन जनावरे असणे आवश्यक आहे.

३) लाभार्थी शेतक-यास धनादेशाद्वारे अर्थसहाय्य द्यावयाचे असल्याने त्याचे राष्ट्रीयकृत / सहकारी बँकामध्ये खाते असणे आवश्यक आहे.

४) या घटकाचा लाभ अल्प-अत्यल्प भूधारक, महिला शेतकरी, अनुसूचित जाती/जमातीच्या शेतकयांना प्राधान्याने देण्यांत यावा.

५) शेतक-यांनी या घटकाचा लाभ मिळणेसाठी विहीत नमुन्यामध्ये अर्ज करणें आवश्यक आहे.

**या योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **१** | **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **२** | **नारळ विकास बोर्डाचे प्रतिनिधी** | **सदस्य** |
| **३** | **संबंधित कृषि विद्यापिठातील उद्यानविद्या शाखेतील शास्त्रज्ञ** | **सदस्य** |
| **४** | **कृषि विकास अधिकारी , जिल्हा परिषद** | **सदस्य** |
| **५** | **कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय** | **सदस्य सचिव** |

वरील प्रमाणे प्रस्तावीत सर्व घटकांतर्गत झालेल्या प्रगतीचा मासिक प्रगती अहवाल विभागीय कृषि सहसंचालक कोकण विभाग ठाणे यांनी एकत्रित करुन दरमहिन्याच्या **७** तारखेस आयुक्तालयास सादर करावा. आयुक्तालयाकडून सद्या अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपुर्वी नारळ विकास मंडळास सादर करावयाचा आहे.

**शासन निर्णय क्र.नाविमा-२०१४/प्र.क्र.१४०/१३अे दिनांक -: ९/७/२०१४ चे सहपत्र**

**प्रपत्र अ**

**नारळ विकास बोर्ड पुरस्कृत एकात्मिक शेतीव्दारे नारळबागांच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणण्याचा कार्यक्रम सन २०१४-१५** **(रु.लाखात)**

| **अ.क्र** | **योजनेचे नाव** | **उद्दिष्ट** | | |
|---|---|---|---|---|
| | | **भौतिक** | **आर्थिक** | |
| | | | **एकूण** | **मंडळाचा हिस्सा** |
| अ | लागवड साहित्याचे उत्पादन आणि वितरण | | | |
| अ.१ | अ) प्रादेशिक नारळ रोपवाटिका स्थापन करणे (५०:५० तत्त्वावर) | १२५००० नारळ रोपे | ४०.००० | २०.००० |
| | ब)लहान नारळ रोपवाटिका स्थापन करणे | | ०.५०० | ०.५०० |
| अ.२ | नारळ लागवडीखालील क्षेत्रात वाढ घडवून आणणे | | | |
| | अ) प्रथम वर्ष @ रु.७५००/प्रति हेक्टर | ५० | ३.७५० | ३.७५० |
| | ब) दुसरा हप्ता @ रु.४०००/ प्रति हेक्टर | ३७.५ | १.५०० | १.५०० |
| अ.३ | एकात्मिक शेतीव्दारे नारळबागांच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणण्याचा कार्यक्रम | | | |
| | अ) प्रात्याक्षिक क्षेत्राची स्थापना | | | |
| | १) प्रथम वर्ष | २०० | ३५.००० | ३५.००० |
| | २) व्दित्तीय वर्ष | ४०७.७ | ७१.३४८ | ७१.३४८ |
| | ब) सेंद्रिय खत प्रकल्प | ५ युनिट (प्रकल्प) | ३.००० | ३.००० |
| | **एकूण** | | **१५५.०९८** | **१३५.०९८** |



--